
माहिती मिळविण्यासाठी भारतीय नागरिकांचा मित्र ठरणारा कायदेशीर हक्क

# माहितीचा अधिकार एक सच्चा दोस्त

# (Right to Information Act)



- माहितीचा अधिकार हा असाधारण कायदा का आहे? त्याचे अधिकारी कोण?
- माहितीचा अधिकार कसा वापरता येतो?
- माहितीचा अधिकार वापरुन उत्तर न मिळाल्यास त्याविरुध्द अपील करता येते का? व अपील कुठे करता येते?
- माहितीचा अधिकार वापरुन मिळविलेली माहिती वापरता येते का?
- माहितीच्या अधिकाराबाबतचे विविध नमुने.

ॲड. अरुण गोविंद देशमुख

# मनोगत

'माहितीच्या अधिकार ... एक सच्चा दोस्त ' या विषयावर पुस्तक लिहिण्याचा योग तसा अचानक आला. मनोरमाचे प्रकाशक श्री. अनिल फडके यांनी या विषयावर या अगोदर ॲड्. कुलकर्णी यांच्याकडून या विषयावर पुस्तक लिहून घेतलेले असल्याने व ते स्वर्गवासी झाल्यावर त्यांनी लिहिलेल्या पुस्तकात या विषयात झालेले नवीन बदल वा माहिती टाकायची किंवा स्वतंत्र पुस्तक लिहिण्याचा घाट घालायचा याबाबत विचारणा केली. या महत्त्वाच्या विषयावर माझा स्वत:चा ठसा व शैली असणाऱ्या लिखाण पद्धतीत पुस्तकाचे लेखन करण्याची इच्छा मी व्यक्त केली व ती त्यांनी मान्य केल्याने त्यानुसार त्याबाबत वाचन व अभ्यास करून अनेकांना भेटून या पुस्तकाचा जन्म झालेला आहे.

माहितीचा अधिकार यामुळे काय झाले असे जर कोणी विचारलेच तर जनता आणि शासन यांच्यातील असणारे परस्परसंबंध संपूर्ण वेगळ्या पातळीवर नेण्याचे कार्य या कायद्याने आम जनतेला प्राप्त झाले आहे. आजपर्यंत शासन सर्वाधिकारी आहे आणि ज्यामुळे हे शासन ज्याच्यासाठी चालते ती जनता दुय्यम आहे अशीच भूमिका पूर्वापार घेतली जात होती. पूर्वी कोणत्याही कागदाची मागणी करणे किंवा शासनदरबारात केलेल्या कोणत्याही कार्याची वा दस्तऐवजाची माहिती मिळणे हे कल्पनेपलीकडले होते. सामान्य माणसाने त्यातूनही जर प्रयत्न केला होता तर त्याला वाटाण्याच्या अक्षता लावणे खूपच सोपे होते. आज मात्र ह्या कायद्यान्वये शासनाचे अधिकारी आपली कामे व्यवस्थितपणे पार पाडत आहेत किंवा नाही हे आता जर आम जनतेने विचारल्यास त्या जनतेला ते समजणार आहे.

जे कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडतील त्यांना या कायद्याचा कुठलाही धाक/भीती राहणार नाही. मात्र ज्यांनी ज्यांनी काही गफला केलेला असेल तर त्याला या कायद्यामुळे कोणत्याही कागदपत्रावर पांघरूण टाकता येणार नाही. जी माहिती संसदेला किंवा राज्य विधिमंडळाला नाकारली जाऊ शकत नाही, अशी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीला संबंधित खात्याच्या माहिती अधिकाऱ्याने पुरविली पाहिजे व गोपनीयतेच्या नावाखाली किंवा अन्य काही कारणाने ती देण्यापासून कोणालाही वंचित ठेवता येणार नाही. हेच या कायद्याचे वैशिष्ट्य आहे.

मध्यंतरी मंत्रालयाला आग लागून अनेक महत्त्वाच्या कागदपत्रांची वा दस्तऐवजांची होळी झाली. ह्या कायद्यामुळे आपले पोल खोलू शकते असे माहिती असणारे वेळप्रसंगी आपल्याच कार्यालयाला आगही लावू शकतात या बाबत

सामान्य नागरिकांना खात्री वाटत असते, त्यामुळेच सक्षम कायदा असला तरी त्यात पळवाटा शोधणारे काही ना काही तरी क्लृप्त्या काढतच जाणार हे प्रत्येक नागरिकाने लक्षात ठेवण्याची गोष्ट आहे.

अगदी काँग्रेस / राष्ट्रवादी या आघाडी सरकारने २०१४ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या अगोदर जाता जाता कायद्याला पळवाट शोधण्याची क्लृप्ती शोधून ठेवली. यामुळे या कायद्याचा प्रभाव निष्प्रभ करण्याचा सकृतदर्शनी तरी प्रयत्न केलेलाच दिसतो. त्यामुळेच पायउतार होता होता अध्यादेश काढून या क़ायद्याच्या क्षेत्रातून लाललुचपत प्रतिबंधक विभागास वगळण्याची चतुर खेळी केलेली दिसते. आणि यांस लोकांकडून विरोध होऊ नये म्हणून याबाबतची माहिती थेट या संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर टाकण्याची क्लृप्ती शासनाने लढवली. लाललुचपत प्रतिबंधक विभाग ही सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचाराचा निपटारा करणारी एक सक्षम यंत्रणा आहे. त्यांच्याकडे सामान्य व्यक्तींपासून सरकारी खाते अंतर्गत अनेक प्रकरणे तपासण्यासाठी येत असतात. अशा आरोप असलेल्या अधिकाऱ्याला सापळा लावून पकडले जाते. किंवा घराची/कार्यालयाची झडती घेत बेहिशेबी संपत्ती ताब्यात घेतली जाते व त्यानुसार त्या अधिकाऱ्यावर कारवाई होते. आतापर्यंत याबाबतीतली माहिती एक सामान्य नागरिक माहिती अधिकाराच्या अंतर्गत मिळवू शकत होता. आता तो ते करू शकणार नाही. तसेच त्या अध्यादेशाद्वारे सरकारी अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक व्यवहारांना आता या अधिकारातून वगळण्यात आलेले आहे. या अध्यादेशाविरूद्ध अर्थातच सर्वोच्च न्यायालयात दाद मागणारी याचिका दाखल करण्यात आली. ज्यात निवाडा देताना न्यायालयाने सरकारी नोकरांची वैयक्तिक माहिती की, ज्याचा सार्वजनिक कामकाजाशी संबंध नाही, ती देता येणार नाही, असा निर्वाळा दिला. या आधारे सरकारने परिपत्रक काढत सर्व सरकारी अधिकाऱ्यांना संरक्षण दिले आहे. सरकारी अधिकाऱ्यांना मिळालेले मेमो, कारणे दाखवा नोटिसा, खात्यांतर्गत शिक्षा, त्यांच्या कामगिरीचा अहवाल याबरोबरीनेच त्यांची संपत्ती, त्यांनी केलेली गुंतवणूक, त्यांनी घेतलेली कर्जे, त्याचे प्राप्तिकराचे विवरणपत्रपासून ते त्यांना त्यांच्या मुलांच्या लग्नकार्यात मिळालेल्या भेटी, आदीबाबत आता माहिती विचारता येणार नाही. या सर्व बंधनाने कदाचित सरकारी अधिकाऱ्यांना त्रास देणाऱ्यांना तशी संधी मिळणार नाही हे जरी जेवढे खरे तसेच त्यांना या कायद्याचा वचक कमी बसेल हेही तेवढेच खरे. त्यामुळे आजही प्रत्येकाला स्वत:च्या अधिकाराबाबत सजगता दाखवणे कसे आवश्यक आहे हेच या उदाहरणातून लक्षात येते.

या कायद्याचा गैरवापरही केलेला आढळून आलेला असून, प्रत्येक नागरिकाने आपल्या ह्या न्याय्य हक्काचा दुरुपयोग करण्याचे टाळले पाहिजे असेच सांगावेसे वाटते. मध्येच पेपरात एक माहिती वाचून गंमत वाटली तसेच कीव करावीशी वाटली. एका महाभागाने म्हणे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्डमध्ये येण्यासाठी एका सरकारी खात्याच्या एकाच डेस्कवर सुमारे ११,००० हून अधिक वेळा या माहितीच्या अधिकाराचा हक्क बजावला असून त्यामुळे त्या डेस्कच्या अधिकाऱ्याची काय अवस्था झालेली असेल याची कल्पना केलेलीच बरी. आणि हो अशी काय वेगवेगळी माहिती त्या महाभागाने विचारली असेल? हे पाहिले की या कायद्याचा दुरुपयोगपण झालेला प्रकर्षाने जाणवतो.

आपल्यासमोर 'माहितीचा अधिकार ... एक सच्चा दोस्त' हे पुस्तक आणताना मला मनापासून आनंद होत आहे. सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाईप करीत लिहिलेले आहे. मला नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या पत्नीचे या पुस्तकाद्वारे मी ऋण व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रण संस्कार श्री. मनोहर साळवी यांनी पाहिलेले आहे. सदर पुस्तकात 'दोन शब्द' लोकांच्या हक्काच्या घरासाठी झटणाऱ्या आरजु स्वाभिमान नागरिक समितीचे सर्वेसर्वा श्री. राजेंद्र मेहता यांनी लिहिलेले असून माहितीचा अधिकार या व्यक्तीने खऱ्या अर्थाने जागवला असेच मी म्हणेन. अनेक सरकारी कार्यालयातून त्यांनी या अधिकाराचा वापर करीत अनन्य साधारण माहिती गोळा केली. तसेच त्या माहितीचा उपयोग लोककल्याणासाठी करण्याचा प्रयत्न केलेला जेव्हा दिसतो तेव्हा या कायद्याचा फायदाही प्रकर्षाने जाणवतो. ज्या संस्थेने व तिच्या प्रमुखाने या माहितीच्या अधिकाराचा लोककल्याणासाठी वापर केला त्याच श्री. राजेंद्र मेहता यांनी यासाठी दोन शब्द लिहिले यासाठी त्यांचे तसेच वरील सर्वांचे मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

हे पुस्तक लिहिण्याची संधी मला मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांच्यामुळे मिळाली असून त्यांच्या ह्या पाठिंब्यामुळेच मला ही साहित्यसेवा अखंडित चालू ठेवता येत आहे व यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वरचरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम ....

**ॲड. अरुण गोविंद देशमुख**

## मुख्य अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. माहिती अधिकार अधिनियम - एक ओळख | २३ |
| २. माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील जबाबदाऱ्या व बंधने. | ३० |
| ३. केंद्रीय माहिती आयोग. | ४८ |
| ४. राज्य माहिती आयोग. | ५३ |
| ५. माहिती आयोगांचे अधिकार. | ५९ |
| ६. माहितीचा अधिकार. | ७७ |
| ७. माहितीच्या अर्जाबाबत. | ८८ |
| ८. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची मार्गदर्शक तत्त्वे. | ९८ |
| ९. माहितीचा अधिकार (विविध अधिनियम व अधिसूचना) | १३७ |
| १०. शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ | १४६ |
| ११. अन्य अधिनियमातील व भारतीय संविधानातील माहितीच्या अधिकाराशी संबंधित तरतुदी. | १६४ |
| १२. भारतीय दंड संहिता, १८६० | १७० |
| १३. केंद्रीय माहिती आयोगाचे काही महत्त्वाचे निर्णय. | १८२ |
| १४. भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | १८३ |
| १५. माहितीचा अधिकार अधिनियम उपयोग - दुरुपयोग | १८८ |
| १६. महत्त्वाचे नमुने | २५९ |

# १. माहिती अधिकार अधिनियम - एक ओळख

खचितच 'माहितीचा अधिकार' हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ च्या खंड (१)(अ)मध्ये समाविष्ट केलेल्या भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क यामधील हक्कांमध्ये मोडतो व तो एक मूलभूत हक्क आहे यात शंकाच नाही. संयुक्त राष्ट्रसंघटनेने देखील १९७८ मध्ये मान्य केलेल्या नागरिकांच्या नागरी व राजकीय अधिकारविषयक आंतराष्ट्रीय अभिसंधीमध्ये देखील नागरिकांना माहितीचा अधिकार दिलेला आहे. माहितीचा अधिकार हा युनोच्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्याशी सुसंगत आहे. आता हा अधिनियम काय आहे तो पाहू या :

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पद्धत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, भारताच्या संविधानाद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहीतगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशीलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत.

आणि ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनांचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, या बाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखताना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, आता, माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे.

भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ -**

१) या अधिनियमास, 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' असे म्हणावे.

२) तो, जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून संपूर्ण भारतास लागू आहे.

३) या अधिनियमाच्या कलम ४ चे पोटकलम (१), कलम ५ ची पोटकलमे (१) व (२), कलमे १२, १३, १५, १६, २४, २७ आणि २८ ताबडतोब अमलात येतील आणि त्याच्या उर्वरित तरतूद तो अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेविसाव्या दिवशी अमलात येतील.

**२. व्याख्या -** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) 'समुचित शासन' (Appropriate Government) याचा अर्थ -

१) केंद्र सरकार किंवा संघराज्य क्षेत्र प्रशासन यांच्याकडून स्थापन करण्यात आलेल्या, घटित करण्यात आलेल्या, त्यांच्याकडे मालकी असलेल्या, त्यांच्या नियंत्रणाखील असलेल्या अथवा त्यांच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निधीद्वारे ज्यांना मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा करण्यात येतो, अशा सार्वजनिक प्राधिकरणांच्या (Public Authority) बाबतीत, केंद्र सरकार, असा आहे.

२) राज्य शासनांकडून स्थापन करण्यात आलेल्या, घटित करण्यात आलेल्या, त्यांच्याकडे मालकी असलेल्या, त्यांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या अथवा त्यांच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निधीद्वारे ज्यांना मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा करण्यात येतो अशा सार्वजनिक प्राधिकरणांच्या बाबतीत, राज्य शासन, असा आहे.

(ब) 'केंद्रीय माहिती आयोग' (Central Information Com mission) याचा अर्थ, कलम १२, पोटकलम (१) खाली घटित करण्यात आलेला केंद्रीय माहिती आयोग, असा आहे.

(क) 'केंद्रीय जन माहिती अधिकारी' (Central Public Information Office) याचा अर्थ, कलम ५, पोटकलम (१) अन्वये पदनिर्देशित नेमणूक करण्यात आलेला केंद्रीय जन माहिती अधिकारी, असा आहे आणि यात कलम ५, पोटकलम (२) अन्वये अशा प्रकारे पदनिर्देशित नेमणूक करण्यात आलेल्या केंद्रीय सहायक जन माहिती अधिकाऱ्याचाही समावेश होतो.

(ड) 'मुख्य माहिती आयुक्त' (Chief Information Commissioner) आणि 'माहिती आयुक्त' (Information Commissioner) याचा अर्थ, कलम १२, पोटकलम (३) अन्वये नियुक्त करण्यात आलेला मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयुक्त, असा आहे.

(ई) 'सक्षम अधिकारी' (Competent Authority) याचा अर्थ :-

(एक) लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या बाबतीत किंवा अशा प्रकारच्या सभा असणाऱ्या संघराज्य क्षेत्राच्या बाबतीत, अध्यक्ष आणि राज्यसभा किंवा राज्य विधानपरिषद यांच्या बाबतीत, सभापती.

(दोन) सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीत, भारताचा मुख्य न्यायमूर्ती;

(तीन) उच्च न्यायालयाच्या बाबतीत, उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूती;

(चार) संविधानाद्वारे किंवा तदन्वये स्थापन किंवा घटित करण्यात आलेल्या अन्य प्राधिकरणांच्या बाबतीत, यथास्थिती, राष्ट्रपती किंवा राज्यपाल.

(पाच) संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक; असा आहे.

(फ) ''माहिती'' (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, मते (अभिप्राय), सूचना, प्रसिद्धिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या(logbook), संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), प्रेस(वृत्त), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.

## अधिकची माहिती

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम २(फ) मधील 'मते' व 'सल्ला' या संज्ञांचा अर्थ, केवळ, सार्वजनिक प्राधिकरणाने एखाद्या प्रकरणामध्ये कोणत्याही एजन्सीकडून, विभागाकडून, व्यक्तीकडून घेतलेला सल्ला व मते असा असून तो फाईलचा भाग असतो. याचा अर्थ कोणताही नागरिक, एखाद्या प्रकरणावर माहिती अधिकाऱ्याकडून सल्ला किंवा मते घेऊ शकत नाही.

सर्वोच्च न्यायालयाने व्होरा समितीचा अहवाल उघड करण्यासंबंधी निर्णय दिला. या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या स्वातंत्र्याच्या नागरिकांच्या हक्काची चर्चा केली व असे प्रतिपादन केले की, आधुनिक घटनात्मक लोकशाहीमध्ये नागरिकांना त्यांनी निवडून दिलेल्या शासनाच्या कारभारासंबंधी तसेच त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या धोरण निश्चितीसंबंधी माहिती मिळण्याचा नागरिकांना हक्क आहे. न्यायालयाने असे प्रतिपादन केले की, लोकशाही ही पारदर्शक व खुलेपणा यातून प्रकट होत असते आणि खुलेपण हे मुक्त लोकशाहीचे लक्षण आहे.

न्यायमूर्ती पी. एन. भगवती यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाच्या खुलेपणाची संकल्पना माहितीच्या हक्कातून थेट विकसित होईल व ती भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(अ) ने दिलेल्या भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कात अंतर्भूत असल्याचे दिसून येते. म्हणून शासकीय कामकाजासंबंधी माहिती उघड करण्याचे नियम असले पाहिजेत व गोपनीयता हा त्याला अपवाद असला पाहिजे.

'माहिती' या व्याख्येतील उत्तरामध्ये अमुक एखादी विशिष्ट गोष्ट का करण्यात आली किंवा का केली नाही, याचे समर्थन देण्याच्या अर्थाने, त्याची कारणे नागरिकांना कळविणे शासकीय माहिती अधिकाऱ्यासाठी अपेक्षित नाही कारण नागरिक, केवळ माहिती मिळण्याची मागणी करू शकतो. असे समर्थन करणे ही बाब अभिनिर्णित करणाऱ्या प्राधिकरणांच्या अखत्यारीत येते आणि तिचे माहिती म्हणून योग्य प्रकारे वर्गीकरण करता येऊ शकत नाही.

कलम २, ३ व ४ चे एकत्रितपणे वाचन केले असता, कलम ३ मध्ये नमूद केलेली माहिती, कलम ४ द्वारे मर्यादित केली जात नाही. कलम ४ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणावर काही बंधने टाकली असून नागरिक माहिती मागतील तेव्हा त्यांना माहिती देण्याच्या कर्तव्यांसह अतिरिक्त कर्तव्याचे पालन करण्यास या कलमाद्वारे सार्वजनिक प्राधिकरणास भाग पाडले आहे. या अधिनियमात निर्धारित केलेल्या माहिती उघड करण्यातून सूट मिळण्यास अधीन राहून, या अधिनियमाच्या व्याख्येप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याच्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या दायित्वाखेरीज अन्य दायित्व पार पाडण्यासाठी या कलमान्वये सार्वजनिक प्राधिकरणास अनिवार्य असते. ती कोणत्याही व्यक्तीने मागितलेली नसते. तसेच कलम २(फ) मध्ये व्याख्या केलेली माहिती, कलम ४ मध्ये नमूद केल्याबाबत या अधिनियमात अन्यत्र कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे केवळ कलम ४ मध्ये नमूद केलेली माहिती नागरिकांना पुरविली पाहिजे हे मानणे चुकीचे आहे.

(ग) 'विहित' याचा अर्थ, यथास्थित, समुचित शासन किंवा सक्षम प्राधिकारी यांनी या अधिनियमाद्वारे तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे.

(ह) 'सार्वजनिक प्राधिकरण' (Public Authority) याचा अर्थ :

(अ) संविधानाद्वारे किंवा तदन्वये.

(ब) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे.

(क) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे.

(ड) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये.

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो असा निकाय.

(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे